# वाणिज्य विभाग
# अहवाल
# २०१९ -२०

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयामध्ये वाणिज्य विभागात सन २०१९-२० मध्ये प्रथम वर्ष वाणिज्य मध्ये ११९ विद्यार्थ्यांनी आणि द्वितीय वर्ष वाणिज्य मध्ये ९२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. हे सर्व उपक्रम वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापकांच्या सहाय्याने पार पाडले. वाणिज्य विभागाच्या अंतर्गत खालील उपक्रम घेण्यात आले.

सन २०१९ - २० मधील जुलै महिन्यामध्ये प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्ष वाणिज्य च्या विद्यार्थ्यांसाठी पहिल्या प्रकरणावर चाचणी परीक्षा घेण्यात आली आणि त्याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन तसेच मूल्यांकन केले.

दिनांक २३ जुलै २०१९ रोजी द्वितीय वर्ष वाणिज्य च्या विद्यार्थ्यांसाठी 'बिजनेस कम्युनिकेशन' (Business Communication) या विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्रामध्ये द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी आपापले विषय सर्व विद्यार्थ्यांसमोर सादर केले. त्यातून उत्कृष्ट सादरीकरण म्हणून कुमारी मनीषा पाटील या विद्यार्थिनीची निवड करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. एस एम जगताप मॅडम यांच्या हस्ते या विद्यार्थिनीला बक्षीस देण्यात आले. या उपक्रमासाठी द्वितीय वर्ष वर्गातील 56 विद्यार्थी सहभागी झाले होते आणि त्यापैकी सात विद्यार्थ्यांनी आपले विषयाचे सादरीकरण केले होते.

PRINCIPAL
K.T.S.P. Mandal's
Sahebraoji Butte Patil ... College
Rajgurunagar, ... Pune

दिनांक २९ सप्टेंबर २०१९ रोजी प्रथम वर्ष वाणिज्य च्या विद्यार्थ्यांसाठी ज्यादा सांचे आयोजन करून त्यांना घेणाऱ्या प्रथम सत्र परीक्षा बद्दल मार्गदर्शन केले. या क्रमात संबंधित विषयाचे ५५ विद्यार्थी उपस्थित होते. तसेच त्यांच्या मनातील शंका त्यांचे निरसनही करण्यात आले.

दिनांक २३ नोव्हेंबर २०१९ रोजी द्वितीय वर्ष वाणिज्य च्या विद्यार्थ्यांसाठी 'फास्टेस्ट लेटर रायटिंग कॉम्पिटिशन"(Fastest Letter Writing Competition) म्हणजेच स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये २१ विद्यार्थी सहभागी झाले होते. या उपक्रमात प्रथम क्रमांकासाठी कु. साहिल मुजावर या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्याला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. एस एम जगताप मॅडम यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.

प्रथम सत्र मध्ये विद्यापीठ नियमानुसार नेमून दिलेल्या अंतर्गत मूल्यांकनाच्या परीक्षेसंबंधी सर्व कामकाज म्हणजेच असाइनमेंट, तोंडी परीक्षा व लेखी परीक्षा घेण्यात आली आणि सर्व विषयांचे अभ्यासक्रम वेळेत आणि योग्य रित्या म्हणजेच विद्यार्थ्यांना समजेल अशा रूपाने पूर्ण केले.

दिनांक ११ फेब्रुवारी २०२० रोजी प्रथम वर्ष वाणिज्य च्या विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी चर्चासत्र आयोजित करण्यात आले. चर्चासत्राचा विषय "व्यावसायिक नीतिमूल्ये" हा होता. या चर्चासत्रामध्ये १६ विद्यार्थ्यांनी आपापल्या विषयांचे सादरीकरण केले आणि त्या सर्व विद्यार्थ्यांमधून उत्कृष्ट सादरीकरण करणारी विद्यार्थिनी म्हणून कुमारी अश्विनी डांगळे हिची निवड करण्यात आली. या विद्यार्थिनीला हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम.जरे सर यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रथम वर्ष वर्गातील संबंधित विषयासंबंधीचे ५५ विद्यार्थी उपस्थित होते. या

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एच. एम. जरे सरांनी विद्यार्थ्यांना मौलिक आणि सोप्या भाषेत मार्गदर्शन केले.

द्वितीय सत्र मधील विद्यापीठ नियमानुसार नेमून दिलेल्या अंतर्गत परीक्षा आणि सर्व प्रात्यक्षिक परीक्षा योग्य वेळेत घेण्यात आल्या आणि गरजेनुसार तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासास मदत होण्यासाठी जादा तासांचे आयोजन करून त्यांना येणाऱ्या ह्या शैक्षणिक वर्षाच्या वार्षिक परीक्षेचे म्हणजेच द्वितीय सत्र परीक्षेचे मार्गदर्शन करून शंका निरसन केले.

सदर वर्षामध्ये परिपूर्ण झालेले सर्वच उपक्रम हे वाणिज्य विभागाचे मुख्य ध्येय म्हणजेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व परिपूर्ण विकास यास अनुसरून झाले. प्रत्येक कार्यक्रमास वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक व इतर प्राध्यापक आणि तसेच विद्यार्थ्यांनी ही आनंदाने सहभाग नोंदविला. सदर वर्ष व उपक्रम यशस्वीरित्या संपन्न झाले.

प्रा.ए.जे.बेंडाले

वाणिज्य विभाग प्रमुख

PRINCIPAL
K.T.S.P. Mandal's